# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे :- ४०१ १०१

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/९४६४/२०२१-२२ दि. २६/०७/ २०२१

## // जाहिरात //

**विषय : कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता खालील नमुद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत. खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह दि. ०२/०८/२०२१ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत ईमेल / ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्जासोबत दिलेल्या विहित नमुन्यामध्ये ईमेलद्वारे शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्र स्कॅन कागदपत्रांसह recruitmentmbmc@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावेत. तसेच ऑफलाईन पध्दतीने अर्ज करण्याकरीता वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, मिरा- भाईंदर महानगरपालिका, (स्व.इंदिरा गांधी भवन), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | एकत्रित मासिक ठोक मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी. मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. ६०,०००/- | ३० |
| २. | वैद्यकीय अधिकारी (आयुष) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस व तत्सम अर्हता पदवी आवश्यक व संबंधित मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. ४०,०००/- | ८० |
| ३. | रुग्णालय व्यवस्थापक | वैद्यकीय पदवीधर, १ वर्षाचा रुग्णालय व्यवस्थापनाचा अनुभव आवश्यक. | रु. ४०,०००/- | ७ |
| ४. | परिचारिका | G.N.M कोर्स उत्तीर्ण / B.Sc. नर्सिंग उत्तीर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक. | रु. २५,०००/- | ६५ |
| ५. | औषध निर्माता | बी. फार्म (B.Pharm) / डी. फार्म ( D.Pharm), Registered with Pharmacy Council, अनुभव असल्यास प्राधान्य. | रु. २०,०००/- | १४ |
| ६. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | बी. एस्सी आणि डि.एम.एल.टी (B.Sc with D.M.L.T), अनुभव असल्यास प्राधान्य. | रु. १८,०००/- | २० |
| ७. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | एच.एस.सी आणि डि.एम.एल.टी (HSC with D.M.L.T), अनुभव असल्यास प्राधान्य. | रु. १५,०००/- | ४४ |
| ८. | प्रसविका | एस.एस.सी/ एच.एस.सी आणि मान्यता प्राप्त संस्थेतील ऑक्झिलरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पूर्ण, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलची नोंदणी आवश्यक | रु. २०,०००/- | ३० |

**अटी व शर्ती :-**

१. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननीअंती प्रारुप गुणवत्ता (Draft List) यादी तयार करुन आवश्यकतेप्रमाणे म्हणजेच महानगरपालिकेला गरज भासेल त्याप्रमाणे प्रारुप गुणवत्ता यादीमधुन मासिक ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाने आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२. सदर जाहीरातील पदसंख्या अथवा इतर बाबींमध्ये बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणाऱ्या भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा बदल करणे अथवा जाहिरातीनुसार होणारी भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असतील.

३. उपरोक्त पदांकरीता कालावधी प्रथमत: ३ महिने किंवा कोरोना (कोविड-१९) चा प्रादुर्भाव संपेपर्यंत, जे आधी घडेल तो पर्यंत असेल. तसेच आवश्यकतेप्रमाणे १ दिवस सेवा खंड करुन पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

४. क्षेत्रीय स्तरावर सामाजिक बांधिलकीने काम करण्याची आवड असावी तसेच शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम असावा.

५. वयोमर्यादा ६० वर्षांपर्यंत.

६. मिरा भाईंदर महानगरपालिकेत कोविड-१९ साठी यापूर्वी ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी काम केलेल्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

७. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यांत येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दुरध्वनीवर करण्यांत येऊ नये.

८. नियुक्त उमेदवारांना कोविड-१९ रुग्णांची सेवा करणे अनिर्वाय राहील.

९. वरील पदे ही संपुर्णपणे मासिक ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायमस्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

१०. सदर पदाच्या कंत्राटी नेमणुका वस्तुनिष्ठ मूल्यांकन (Objective assessment) पध्दतीने पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन करण्यांत येतील.

११. निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मुळ कागदपत्रांसह एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मुळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच घेऊन नियुक्तीसाठी हजर राहणे आवश्यक आहे.

१२. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पुर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, गुणपत्रक, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती (True copy) जोडलेले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

१३. प्रारुप गुणवत्ता यादी (Draft List) मधून नियुक्ती करण्यात येणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर ०३ दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक राहील.

१४. वरील पदासाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार वैद्यकीय आरोग्य अधिकारी / विभाग प्रमुख यांना राहतील.

१५. सदर पदांना दररोज किमान आठ तास (रुग्णालयाच्या सोईनुसार ) सेवा देणे बंधनकारक असेल. तथापि, कोविड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेता अत्यावश्यक सेवा असल्याने आवश्यकतेप्रमाणे जादाचे कामकाज करावे लागेल व त्याचे अतिरिक्त मानधन अदा करण्यात येणार नाही. पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार विभाग प्रमुख यांचे असतील.

१६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१७. सदरची नियुक्ती ही ठोक मानधन तत्वावर कंत्राटी स्वरुपाची व कोविड-१९ साथरोग कालावधीसाठी आहे. साथरोगाचा प्रादुर्भाव संपल्यानंतर त्यांची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल. त्यापुढे त्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा भविष्यात कायम स्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क राहणार नाही.

१८. पात्र उमेदवारास नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१९. उमेदवाराला नियुक्तीनंतर राजीनामा द्यावयाचा असल्यास किमान १५ दिवसांची लेखी नोटीस द्यावी लागेल अन्यथा त्या महिन्याचे मानधन अदा केले जाणार नाही.

२०. संशयास्पद सचोटी, गैरवर्तवणुक/अशोभनीय वर्तन, वरीष्ठाची दिशाभुल करणे, गैरहजर राहणे, आदेशाचे पालन न करणे याबाबत कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा संपुष्टात आणली जाईल.

२१. वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती संबधितांना लागू राहतील. तसेच उमेदवाराचे काम समाधानकारक नसल्यास कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

२२. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन व दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२३. विहित मुदतीत विहित नमुन्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमुना) अर्ज प्राप्त न झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत यांची स्पष्ट नोंद घ्यावी.

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

**(संजय शिंदे)**
उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- .............................................................पदांचा सांकेतिक क्र. .................. )

प्रति,
**मा. उप-आयुक्त (वैद्यकीय)**
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

फोटो

| | | | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|---|---|
| (१) | संपुर्ण नांव | : | | |
| १. | **आडनांव** | : | .............................................. | .............................................. |
| २. | **स्वत:चे नांव** | : | .............................................. | .............................................. |
| ३. | **वडिलांचे/ पतीचे नांव** | : | .............................................. | .............................................. |

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : ..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ..............................................................................................

(३) **अ) जन्मतारीख** :

| **तारीख** | | **महिना** | | **वर्ष** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांक रोजीचे वय** ..........................**वर्ष**..........................**महिने**............**दिवस**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(५) **शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/ विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.**

१) गुणपत्रिका २) पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र ३) नोंदणी प्रमाणपत्र

**अर्जदाराची सही/-**

**ठिकाण** :-

**दिनांक** :-